# कॉलेरा (पटकी )

दरवर्षी पावसाळ्यात पाण्यातून पसरणारे अनेक साथीचे आजार पसरतात. शासकीय आरोग्य विभागाने यावर्षी मलेरीया व डेंग्यूचे रूग्ण कमी झाल्याचे म्हटले असले तरी गॅस्ट्रो आणि पटकी (कॉलेरा) या रोगांच्या रूग्णसंख्येत लक्षणीय वाढ झालेली आहे. पटकी हा पाण्यातून पसरणारा रोग आहे. आपल्या प्रत्येकाची ही नैतिक आणि सामाजिक जबाबदारी आहे की आपण अशाप्रकारे पाण्यातून पसरणाऱ्या पावसाळी रोगांबाबत सजग असले पाहिजे तसेच आपल्याबरोबर इतरांनाही सजग केले पाहिजे.

- जीवाणूसंसर्गाचा आजार
- दूषीत पाण्यातून प्रसार
- जीवघेणी हगवण आणि शरीर शूष्कता
- उपचारास सोपा
- उपचार न झाल्यास काही तासातच मृत्यू
- शरीर शूष्कतेने मृत्यू ओढवतो जो अतिशय सामान्य उपाय योजनेने टाळता येऊ शकतो म्हणजेच क्षारसंजीवनी

**पटकी (कॉलेरा) म्हणजे काय ?**

ग्राम निगेटीव्ह बॅक्टेरीअम विब्रीओ कॉलेरी या जीवाणूमुळे कॉलेरा हगवण होणारा रोग होतो.

पटकीची लागण झालेल्या रूग्णास अतिशय गंभीर स्वरूपाची , ज्यामुळे हगवण पाण्यासारखी होते शरीरातील पाण्याची पातळी अतिशय खाली जाते आणि उपचार न झाल्यास काही तासातच मृत्यू ओढवतो.

**पटकी कशामुळे होते ?**

विब्रीओ कॉलेरी या जीवाणूचा पाण्यात प्रादुर्भाव झाल्यामुळे कॉलेरा हा रोग पसरतो. त्याचा जीवन कालावधी दोन तास ते पाच दिवस इतकाच असतो.

विब्रीओ कॉलेरी -

१. ५६ अंश तापमानाती ३० मिनिटात मरतो
२. उकळत्या पाण्यात काही सेकंदात मरतो
३. क्रेसॉल किंवा ब्लिचिंग पावडर सारख्या जंतूनाशकांमुळे तात्काळ नाश पावतो (६mg/1)
४. pH५ किंवा त्यापेक्षाही कमी आम्ल संहतीत त्वरित नाश पावतो
५. बर्फात ४ ते ६ आठवडे किंवा त्यापेक्षा अधिक काळ जीवंत राहू शकतो.




**कॉलेऱ्याची लक्षणे काय आहेत?**

सर्वसाधारणपणे विब्रीओ कॉलेरीची लागण झालेल्या ७५% लोकांमध्ये ७ ते १४ दिवस जरी हे जीवाणू त्यांच्या विष्ठेत आढळले तरीही या रोगाची कोणतीही लक्षणे आढळत नाहीत. त्यामुळे त्यांचा वातावरणात पुन:प्रवेश अगदी सहज होतो व त्याची लागण इतरांना अगदी सहजतेने होतो. त्याची लक्षणे पुढीलप्रमाणे :-

१. पाण्यासारखे पातळ जुलाब (कॉलेऱ्यामुळे होणारे जुलाब अतिशय पातळ, फिकट दुधाळ रंगाचे तांदूळ धुतलेल्या पाण्यासारखे असतात)
२. मळमळ आणि उलट्या
३. पोटात पेटके
४. डोकेदुखी
५. शरीर शूष्कता (कॉलेऱ्यामुळे होणाऱ्या शरीरशूष्कतेमुळे चिडचिड , आळस , डोळे खोल जाणे, तोंड कोरडे पडणे, अतिशय तहान लागणे, त्वचा कोरडी पडणे, चुण्या पडणे, लघवीला न होणे किंवा अतिशय कमी प्रमाणात होणे, रक्तदाब कमी होणे आणि हृदयाची स्पंदने अनियमित होणे)

**कॉलेऱ्यावर उपचार कसे करतात ?**

कॉलेऱ्यावर अगदी सहज उपचार करता येतात. योग्य उपचारामुळे मृत्यूदर १%पेक्षा कमी होतो.

१. **पुनरुज्जीवीत करणे** : अगदी पहिला उपचार म्हणजे शरीरातून गेलेले पाणी पुनःश्च भरून काढणे. असे पाणी पिऊन किंवा अगदी तातडीची गरज असल्यास सलाईनमधून पाण्याचे प्रमाण वाढविणे. सर्वसाधारणपणे ८०%लोकांना क्षारसंजीवनीचा वापर केल्याने मोठा फायदा होतो.

२. **प्रतिजैविके** : शरीर शूष्कतेमुळे होणाऱ्या गंभीर परिणामामुळे प्रतिजैविकांचा वापर करणे आवश्यक असते आणि उलट्या थांबताच त्याचा वापर सुरू करावा. टेट्रासायक्लिन, डॉक्सीसायक्लीन किंवा सिप्रोफ्लॉक्सासीन या औषधांचा वापर करतात. यामुळे संडासचे प्रमाण कमी होते आणि रूग्णालयातील वास्तव्याचा कालावधी कमी होतो, जीवाणूंचे उत्सर्जन कमी होते आणि पातळ पदार्थांच्या सेवनाची गरज कमी होते. प्रतिजैविकांचा अधिक वापर प्रस्तावित नाही कारण त्यामुळे कॉलेऱ्याच्या प्रसारात परिणाम होत नाही आणि सूक्ष्म जीवाणूंचा प्रतिरोध वाढतो.

याशिवाय अन्य कोणतीही ॲन्टीस्पास्मोडीक , ॲन्टीडायरीअल औषधे आवश्यक नाहीत. ४८ तासांनंतर पुन्हा हगवण सुरू झाल्यास प्रभावी प्रतिजैविकांचा वापर अनिवार्य ठरतो.

**कॉलेऱ्यापासून बचाव कसा करावा ?**

- उकळलेले पाणी प्यावे किंवा क्लोरीन अथवा आयोडिन या जंतूनाशकांचा वापर करावा.
- चहा आणि कॉफी सारखी उकळलेली पेय प्यावी आणि बर्फ न घातलेली बाटलीबंद पेये प्यावी
- शिजलेल्या भाज्या खाव्या , कच्च्या भाज्या अजिबात खाऊ नये.
- फक्त शिजलेले अन्न गरम असताना खावे, सोलून खाण्यासारखी फळे खावी.
- कमी शिजलेले आणि मासे किंवा समुद्री अन्नपदार्थ खाऊ नयेत
- रस्त्यांवरील अन्न पदार्थ आणि पेये घेऊ नयेत
- साबण व पाण्याने हात वारंवार धुवावे
- साबण आणि पाणी उपलब्ध नसल्यास अल्कोहोलयुक्त हॅण्डक्लिनरचा वापर करावा. (६०%पेक्षा कमी अल्कोहोल)
- खाण्यापूर्वी किंवा स्वयंपाक करण्यापूर्वी आणि बाथरुमचा वापर केल्यावर हात स्वच्छ धुवावे.

**संदर्भ :**


1. http://www.maha-arogya.gov.in
2. http://www.who.int/cholera/
3. www.cdc.gov



**संकलन - कु. किन्नरी देसाई**

औषध माहिती केंद्र प्रमुख ,

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद